पुढारी




गडहिंग्लज : काळभैरी डोंगर परिसरात श्री रवळनाथ संस्था समूहामार्फत वृक्षारोपण करताना एम. एल. चौगुले. शेजारी डी. बी. काटकर, डॉ. दत्तात्रय पाटील, महेश मजती, एस. एन. देसाई आदी.

# रवळनाथ संस्था समूहातर्फे काळभैरी डोंगर परिसरात वृक्षारोपण

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी, ज्ञानदीप प्रबोधिनी व श्री महालक्ष्मी वुमेन्स सोसायटी या श्री रवळनाथ संस्था समूहामार्फत डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाऊंडेशन संचलित चांगुलपणाची चळवळ अंतर्गत काळभैरी डोंगर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. श्री रवळनाथ संस्था समूहाचे प्रमुख एम. एल. चौगुले यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा प्रारंभ झाला. वनविभागाचे निवृत्त अधिकारी डी. बी. काटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

एम. एल. चौगुले, संचालक प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील यांनी उपक्रमाची माहिती दिली. यावेळी डोंगर परिसरात अर्जुन, आवळा, महारुप, आपटा, बहावा, वड, पिंपळ, करंज, कडूलिंब, पाटल या जातीची ५० झाडे लावण्यात आली. डी. बी. काटकर यांचा एम. एल. चौगुले यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी संचालक महेश मजती, प्रा. डॉ. मनोहर पुजारी, महालक्ष्मी वुमेन्स सोसायटीच्या मानद सचिव गौरी बेळगुद्री यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. संचालक प्राचार्य एस. एन. देसाई यांनी आभार मानले.